RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ७, अंक १५९] गुरुवार, डिसेंबर २३, २०२१/पौष २, शके १९४३ [पृष्ठे ९, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३८७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**

**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ डिसेंबर २०२१.

**अधिसूचना**

**अहमदनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) (सुधारणा) नियम,२०२१.**

क्रमांक. अमपा-२०१७/प्र.क्र.३३८/नवि-२५.––अहमदनगर महानगरपालिकेमध्ये अंमलात असलेले सध्याचे अहमदनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१६ मध्ये, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५७ (३) अंतर्गत सुधारणा करण्यासाठी याद्वारे पुढील नियम करण्यात येत आहेत :–

**नियम**

**१. संक्षिप्त नाव, प्रारंभ व व्याप्ती :–**

१. या नियमांना "अहमदनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) (सुधारणा) नियम, २०२१" असे संबोधण्यात येईल.

२. हे नियम अंतिमरित्या राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.

३. या नियमांन्वये, अहमदनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१६ (यात यापुढे ज्याचा उल्लेख, "मुख्य नियम" असा करण्यात आला आहे) च्या परिशिष्ट (२) मधील तक्त्यातील स्तंभ क्र. २ मधील सेवा व संवर्ग यामध्ये, अ.क्र.९४ ते १०२ समोरील स्तंभ क्र.२ मधील आरोग्य सेवा या ऐवजी "वैद्यकीय सेवा", आणि अ.क्र.१०३ ते १०७ समोरील स्तंभ क्र.२ मधील "आरोग्य सेवा" या ऐवजी "निम वैद्यकीय सेवा" अशी सुधारणा करण्यात येत आहे.

४. या नियमांन्वये, मुख्य नियमांतील परिशिष्ट (२) मधील अनुक्रमांकासमोरील पदांच्या"नेमणुकीची पध्दत व टक्केवारी" आणि "नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती" यामध्ये खालील तक्त्यातील उक्त क्रमांकासमोरील पदासमोर दर्शविल्यानुसार सुधारणा करण्यात येत आहे.

५. मुख्य नियमांतील परिशिष्ट (२) मध्ये, पदोन्नती कोट्यातील पदांवर पदोन्नतीसाठी निम्न संवर्गातील पदावर किमान ०५ वर्षे सेवेच्या अनुभवाची अट विहित करण्यात आली आहे. याअनुषंगाने, "अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-क (वर्ग-३) पासून गट-अ (वर्ग-१) मधील सर्व टप्प्यांपर्यंतच्या आंतरश्रेणी पदोन्नतीसह प्रत्येक टप्प्यावर पदोन्नती करताना, निकटतम निम्न संवर्गातील पदावर किमान ०३ वर्षाच्या नियमित सेवेची अट पदोन्नतीसाठी पूर्व अट म्हणून राहील व त्यामध्ये कोणतीही शिथिलता अनुज्ञेय असणार नाही, अशी मुख्य नियमांत सुधारणा करण्यात येत आहे.

**अहमदनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) (सुधारणा) नियम, २०२१**

परिशिष्ट (२)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५ व ५३ (१) च्या तरतुदीनुसार नेमणूक करावयाच्या पदांसाठी कलम ४५ (३) व ४५७ (३) अन्वये विहित शैक्षणिक व इतर अर्हता (पहा (नियम ३))

| मूळ सेवा प्रवेश नियमांतील अ.क्र. | सेवा व वर्ग | पदनाम | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी १.नामनिर्देशन २.पदोन्नती ३.प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीची अर्हता व नेमणुकीची पध्दत |
| १ | २ | ३ | ५ | ६ | ७ |
| ४ | प्रशासकीय सेवा श्रेणी – २ | **सहाय्यक आयुक्त** | पदोन्नती ५०% | | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कोणत्याही शाखेची पदवी.<br>२) उपरोक्त शैक्षणिक अर्हता धारण करणा-या महापालिका आस्थापनेवरील प्रभाग अधिकारी या संवर्गात किमान ०३ वर्षांचा अनुभव धारण केलेल्या उमेदवारांमधून सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे. |
| | | | प्रतिनियुक्ती ५०% | | शासन सेवेतील / स्थानिक स्वराज्य सेवेतील समकक्ष पद ३ वर्षापासुन धारण करणारे अधिकारी. |
| ८ | प्रशासकीय सेवा श्रेणी – ३ | **वरिष्ठ लिपिक** | पदोन्नती १०० % | | अ) महानगरपालिका आस्थापनेवरील लिपिक / लिपिक टंकलेखक या संवर्गातील किमान ०३ वर्षांचा अनुभव धारण केलेल्या उमेदवारांमधून ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे.<br>ब) विभागीय परीक्षा उत्तीर्ण आवश्यक.<br>क) MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र आवश्यक. |
| ९ | प्रशासकीय सेवा श्रेणी – ३ | **लिपिक / लिपिक-टंकलेखक** | नामनिर्देशन ७५% | ३३ | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>ब) राज्य शासनाची मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. (जीसीसी) / इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि.परीक्षा उत्तीर्ण.<br>क) महाराष्ट्र राज्य उच्च तंत्र शिक्षण मंडळ,मुंबई यांचेकडील अधिकृत MS- |

| मूळ सेवा प्रवेश नियमां तील अ.क्र. | सेवा व वर्ग | पदनाम | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी १.नामनिर्देशन २.पदोन्नती ३.प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीची अर्हता व नेमणुकीची पध्दत |
| १ | २ | ३ | ५ | ६ | ७ |
| | | | | | CIT परीक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E,A,C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवां A स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>ड) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक |
| | | | पदोन्नती :-२५% | | अ) किमान एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) राज्य शासनाची मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. (जीसीसी) / इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि.परीक्षा उत्तीर्ण.<br>क) MS-CIT किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण.<br>ड) महानगरपालिका सेवेतील शिपाई / बिगारी किंवा तत्सम गट-ड च्या संवर्गात किमान ०३ वर्षाची सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांमधून ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे नेमणूक करता येईल. |
| ४३ | तांत्रिक सेवा श्रेणी — ३ | संगणक प्रोग्रॅमर | नामनिर्देशन १०० % | ३३ | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची संगणक अभियांत्रिकी मधील पदवी (B.E. Computer) किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) सिस्टीम ॲनालिस्ट / प्रोग्रामिंग / सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट मधील किमान ५ वर्षांचा अनुभव. |
| ४४ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी — १ | शहर अभियंता | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | ४० | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>ब) एम.ई. (स्ट्रक्चर / रोड अँण्ड ब्रिजेस / पर्यावरण अभियांत्रिकी / सिव्हिल / वॉटर रिसॉर्सेस / सिव्हिल सॉईल /सिव्हील कन्स्ट्रक्शन / सिव्हिल ट्रान्सपोर्टेशन |

| मूळ सेवा प्रवेश नियमांतील अ.क्र. | सेवा व वर्ग | पदनाम | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी १.नामनिर्देशन २.पदोन्नती ३.प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीची अर्हता व नेमणुकीची पध्दत |
| १ | २ | ३ | ५ | ६ | ७ |
| | | | | | व तत्सम विषयातील) पदव्युत्तर पदवी धारकास प्राधान्य.<br>क) राज्य शासनाकडील व महानगरपालिका कडील उप अभियंता (स्थापत्य) या पदावर किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| | | | पदोन्नती १००% | | नामनिर्देशनासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणा-या महानगरपालिका सेवेतील कार्यकारी अभियंता पदावरील किमान ०३ वर्षाचा अनुभव. |
| | | | प्रतिनियुक्ती (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | | राज्य शासनाच्या कार्यकारी अभियंता संवर्गातील अधिका-याच्या प्रतिनियुक्तीने |
| ५२ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी – १ | जल अभियंता | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | ३३ वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य / यांत्रिकी अभियांत्रिकी शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) एम्.ई. (पर्यावरण अभियांत्रिकी / सिव्हील/ वॉटर रिसॉर्सेस/ सिव्हील सॉईल/ सिव्हील ट्रान्सपोर्टेशन व तत्सम विषयातील) पदव्युत्तर पदवी धारकास प्राधान्य.<br>क) राज्य शासनाकडील व महानगरपालिकेकडील उप अभियंता (पाणीपुरवठा/पाटबंधारे विभाग) या पदावरील किमान ०५ वर्षांचा अनुभव. |
| | | | पदोन्नती १००% | --- | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणा-या महापालिका आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) पदावरील किमान ०३ वर्षाचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांमधून जेष्ठता व गुणवत्ता या आधारे. |

| मूळ सेवा प्रवेश नियमांतील अ.क्र. | सेवा व वर्ग | पदनाम | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी १.नामनिर्देशन २.पदोन्नती ३.प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीची अर्हता व नेमणुकीची पध्दत |
| १ | २ | ३ | ५ | ६ | ७ |
| | | | प्रतिनियुक्ती (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | --- | राज्य शासनाच्या कार्यकारी अभियंता संवर्गातून प्रतिनियुक्तीने. |
| ६४ | शहर विकास सेवा श्रेणी — १ | सहाय्यक संचालक नगररचना | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | --- | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी (बी.ई. सिव्हील)<br>ब) राज्य/केंद्र शासनाकडील नगर रचना विषयाचा मान्यताप्राप्त अभ्यासक्रम पूर्ण.<br>क) उपरोक्त शाखेतील पदवी आणि/किंवा सहाय्यक नगररचनाकार या पदावर किमान ०५ वर्षाच्या अनुभव धारकास प्राधान्य. |
| | | | पदोन्नती १००% | --- | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणा-या महापालिका आस्थापनेवरील नगररचनाकार या पदावरील किमान ०३ वर्षाचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांमधून जेष्ठता व गुणवत्ता या आधारे. |
| | | | प्रतिनियुक्ती (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | --- | शासनाकडील सहाय्यक संचालक नगररचना या संवर्गातून प्रतिनियुक्तीने. |
| ६४-अ | शहर विकास सेवा श्रेणी — १ | नगररचनाकार | पदोन्नती १००% | --- | महापालिका आस्थापनेवरील सहाय्यक नगररचनाकार या पदावरील किमान ०३ वर्षाचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांमधून जेष्ठता व गुणवत्ता या आधारे. |

| मूळ सेवा प्रवेश नियमां तील अ.क्र. | सेवा व वर्ग | पदनाम | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी १.नामनिर्देशन २.पदोन्नती ३.प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीची अर्हता व नेमणुकीची पध्दत |
| १ | २ | ३ | ५ | ६ | ७ |
| | | | प्रतिनियुक्ती (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | --- | शासनाकडील नगररचनाकार या सवंर्गातून प्रतिनियुक्तीने. |
| ६६ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी – ३ | आरेखक (ड्रॉप्समन) / आर्किटेक्चरल असिस्टंट. (ड्राप्ट्समन (सिव्हील)) | नामनिर्देशन १०० % | ३३ | अ) राज्य माध्यमिक / उच्च माध्यमिक शालांत शिक्षण मंडळाची परिक्षा उत्तीर्ण<br>ब) शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा आरेखक / आर्किटेक्चरल ड्रोप्समन / अनुरेखक किंवा तत्सम समतुल्य अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र. |
| ६८ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी – १ | उप अभियंता (विद्युत) | नामनिर्देशन / पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास | ३३ वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी अथवा तत्सम समकक्ष शाखेची पदवी.<br>ब) पदव्युत्तर पदवी आणि/अथवा समकक्ष पदावरील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| | | | पदोन्नती १००% | --- | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील शाखा अभियंता या संवर्गात किमान ०३ वर्षाचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांमधून सेवा जेष्ठता व गुणवत्ता या आधारे. |
| ६९ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी – २ | शाखा अभियंता (विद्युत) | नामनिर्देशन ५० % | ३३ वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी शाखेची अथवा समतुल्य शाखेची पदवी/ पदविका.<br>ब) पदव्युत्तर पदवी अथवा समतुल्य पदावरील कामाच्या अनुभव धारकांस प्राधान्य. |

| मूळ सेवा प्रवेश नियमांतील अ.क्र. | सेवा व वर्ग | पदनाम | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी १.नामनिर्देशन २.पदोन्नती ३.प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीची अर्हता व नेमणुकीची पध्दत |
| १ | २ | ३ | ५ | ६ | ७ |
| | | | पदोन्नती ५० % | --- | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील विद्युत पर्यवेक्षक या संवर्गात किमान ०३ वर्षाचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांमधून सेवा जेष्ठता व गुणवत्ता या आधारे. |
| ९५ | वैद्यकीय सेवा श्रेणी – १ | वैद्यकीय अधिक्षक | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | ४० वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यक शास्त्रातील पदव्युत्तर पदवी. [M.D. /M.S.(Clinical)]<br>ब) रुग्णालय प्रशासन पदविका (D.H.A.) धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य.<br>क) राज्य/ केंद्रशासन/ निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील किमान ३०० खाटांच्या रुग्णालयातील निवासी वैद्यकीय अधिकारी वा तत्सम पदावरील किमान ५ वर्षांचा पर्यवेक्षीय व कार्यकारी पदाचा अनुभव आवश्यक. |
| | | | पदोन्नती १००% | | नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणा-या महापालिका आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी वा तत्सम या संवर्गातील किमान ०३ वर्षाचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांमधून सेवा जेष्ठता व गुणवत्ता या आधारे. |
| | | | प्रतिनियुक्ती (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | --- | नामनिर्देशनासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या शासनाकडील योग्य अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीने. |

| मूळ सेवा प्रवेश नियमांतील अ.क्र. | सेवा व वर्ग | पदनाम | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी १.नामनिर्देशन २.पदोन्नती ३.प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीची अर्हता व नेमणुकीची पध्दत |
| १ | २ | ३ | ५ | ६ | ७ |
| ९६ | वैद्यकीय सेवा श्रेणी – १ | आरोग्याधिकारी (प्रतिबंधात्मक उपाय / घनकचरा व्यवस्थापन | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | ४५ | अ).मान्यताप्राप्त विद्यापिठाची वैद्यक शास्त्रातील सार्वजनिक प्रतिबंधात्मक व सामाजिक आरोग्य शास्त्र शाखेची पदव्युत्तर पदवी (M.D.(P.S.M.) परीक्षा उत्तीर्ण.<br>ब).शासन / केंद्रशासन / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील प्रभाग वैद्यकिय अधिकारी वा तत्सम पदावरील किमान ०५ वर्षाचा पर्यवेक्षीय व कार्यकारी पदाचा अनुभव आवश्यक.<br>क).रुग्णालयातील प्रशासन, सार्वजनिक आरोग्य व प्रतिबंधात्मक उपचारात्मक बाबी समर्थपणे हाताळण्याचा व विशेषत: स्वच्छता पर्यवेक्षण, साथआजार निर्मूलन कार्यक्रम हिवताप नियंत्रण आदि बाबींच्या कार्याचा ०५ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव धारण करण-या उमेदवारांस प्राधान्य. |
| | | | पदोन्नती १००% | | नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणा-या महापालिका आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी वा तत्सम या संवर्गातील किमान ०३ वर्षाचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांमधून सेवा जेष्ठता व गुणवत्ता या आधारे. |
| १०१ | वैद्यकीय सेवा श्रेणी – १ | बालरोगतज्ञ | नामनिर्देशन १००% | ३५ वर्षे | अ) मान्यता प्राप्त विद्यापिठाची एम. डी., डी.सी.एच./एम.डी. (बालरोग चिकित्सा शास्त्र) किंवा एम.बी.बी.एस., डी.सी.एच. किंवा समकक्ष पदवी.<br>ब) शासकीय/ निमशासकीय/ खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |

| मूळ सेवा प्रवेश नियमां तील अ.क्र. | सेवा व वर्ग | पदनाम | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी १.नामनिर्देशन २.पदोन्नती ३.प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीची अर्हता व नेमणुकीची पध्दत |
| १ | २ | ३ | ५ | ६ | ७ |
| १०३ | निम वैद्यकीय सेवा श्रेणी — ३ | एक्सरे टेक्नीशियन | नामनिर्देशन १००% | ३३ | अ) मान्यता प्राप्त विद्यापिठाची भौतिकशास्त्र या विषयासह विज्ञान शाखेची पदवी<br>ब) शासन मान्यता प्राप्त संस्थेतुन 'क्ष-किरण तंत्रज्ञ' या विषयाचे प्रशिक्षण पूर्ण<br>क) वैद्यकीय प्रयोगशाळेतील किमान ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक |
| १०५ | निम वैद्यकीय सेवा श्रेणी — ३ | लॅब असिस्टंट | नामनिर्देशन १००% | ३३ | अ) उच्चमाध्यमिक शालांतपरिक्षा उत्तीर्ण<br>ब) मान्यताप्राप्त संस्थेची D.M.L.T. किंवा समकक्ष पदविका.<br>क) शास्त्र शाखेचा पदवीधर आणि डी.एम.एल.टी. पदविका धारकास प्राधान्य. |
| १०७ | निम वैद्यकीय सेवा श्रेणी — ३ | अन्ननिरिक्षक | नामनिर्देशन १००% | ३३ | अ) मान्यता प्राप्त विद्यापिठाची औषध निर्माण शास्त्राची पदवी किंवा रसायन शास्त्र विषयाची पदव्युत्तर पदवी आणि शासनाचा अन्न निरिक्षक प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर किमान ०३ वर्षाचा संबधीत कामाचा अनुभव. |
| ११३ | आरोग्य सेवा श्रेणी — ४ | दाया | पदोन्नती १००% | | महानगरपालिका सेवेतील आया पदावरील प्रत्यक्ष कामाचा ०३ वर्षाचा अनुभव धारण केलेल्या उमेदवारांमधून सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे. |
| ११४ | आरोग्य सेवा श्रेणी — ४ | आया | नामनिर्देशन १००% | | अ) इयत्ता ७ वी परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) मराठी लिहता, वाचता व बोलता येणे आवश्यक. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शं. त्र्यं. जाधव,**
शासनाचे उपसचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.